आणि

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय वा.वा.
दा.क. १२



BVBK-0401284

शं.रा.देवळे

किशोरांसाठी पौराणिक कथा

मित्र असावा तर असा !

# श्रीकृष्ण आणि सुदामा

लेखक

शं. रा. देवळे

क्र. १२८४ दि० ३।७।९
विषय

BVBK-0401284

मंगल प्रकाशन

८५ माधवनगर,

नागपूर ४४० ०१०

प्रकाशन क्रमांक : ७४ :

प्रकाशिका सौ. वीणा तिजारे, मंगल प्रकाशन, ८५ माधवनगर, नागपूर १०
प्रथमावृत्ती गणेश चतुर्थी १९८०
सर्वाधिकार © शं. रा. देवळे, श्रीविठ्ठल सदन, २३, आनंदबाग, नवीपेठ, पुणे ३०
पृष्ठसंख्या ३२
मूल्य दोन रुपये पंचवीस पैसे
मुद्रक मधुसूदन वनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १२

# प्रकाशकीय निवेदन

मुलांनो,

श्रीकृष्ण व सुदामा यांच्या मित्रप्रेमाची कथा तुमच्या हाती देताना आनंद होत आहे. त्यांच्या प्रेमात आपुलकी होती, स्नेहभाव होता की जो बाजारातही उपलब्ध होत नाही. तुमच्या जीवनातही हा गरीब, हा श्रीमंत असा भेदभाव न ठेवता तुम्ही असेच परस्परावर प्रेम करणारे, अडीअडचणीला उपयोगी पडणारे मित्र जोडा.

या आनंदाच्या झऱ्यात डुंबण्याचा आनंद खूप मोठा आहे तो आनंद तुमच्या जीवनात फुलो ही सदिच्छा !

—प्रकाशिका

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | अगदी भाऊ भाऊ शोभतात ! | ५ |
| २. | न सांगता केलेले काम ! | ७ |
| ३. | आश्रमाचा निरोप ! | ११ |
| ४. | कृष्णाची आठवण ! | १३ |
| ५. | कृष्णाकडे जाण्याचा बेत ! | १६ |
| ६. | द्वारकेत तर पोहोचलो ! | २१ |
| ७. | श्रीकृष्णाला पोहे आवडले ! | २४ |
| ८. | खूप झाला पाहुणचार ! | २७ |
| ९ | असे हे मित्रप्रेम ! | ३१ |

१२८४ दि. ३१।७।८७

# अगदी भाऊ भाऊ शोभतात !

पावसाळा जवळ आला होता. एकदा तो सुरू झाला की मग धो धो कोसळू लागेल. आश्रम गळू लागेल. मग मुलांची पंचाईत होईल. सगळ्यांचेच हाल होतील. पण असे कसे होईल ? सांदीपनी गुरुजींना याची कल्पना होती. म्हणूनच पावसाळ्यापूर्वी आश्रमाचे काम सुरू झाले होते.

सगळी मुले काम करीत होती. कोणी माती खणीत होते. कोणी पाणी आणीत होते. कोणी मातीने भिंती लिपीत होते. कोणी लाकडे आणीत होते. सगळेच आपापल्या कामात दंग होते. तो पहा कृष्ण. तो सगळीकडे फिरत होता. कामावर देखरेख करत होता. प्रत्येकाजवळ जाऊन काम पहात होता. चुकेल त्याला स्वत: करून दाखवीत होता. पाठीवरून हात फिरवून उत्तेजन देत होता. दोन मुले चिखल तयार करीत होती. श्रीकृष्ण तेथे गेला. मातीचा ढीग होता पण पाण्याचा पत्ता नव्हता. श्रीकृष्णाने विचारले, 'पाणी आणायला कोण गेले आहे ?'

'सुदामा !'

'मग इतका वेळ ?' श्रीकृष्णाने तो प्रश्न विचारला तोच त्याला सुदामा येताना दिसला. त्याच्या डोक्यावर मातीची मोठी पाणी भरलेली घागर होती. अगोदरच अशक्त असलेल्या सुदाम्याला ते ओझे पेलवत नव्हते. तो हळूहळू चालत होता. पाय वेडेवाकडे पडत होते. ओठ घट्ट दाबून तो तसाच येत होता.

श्रीकृष्णाने त्याला पाहिले. तो लगेच निघाला. सुदाम्याजवळ गेला. सुदामा 'नको नको' म्हणत असतानाच श्रीकृष्णाने

त्याच्या डोक्यावरील घागर घेतली. ते ओझे घेऊन तो सहज चालत मातीच्या ढिगापाशी आला. त्याने भांडे खाली ठेवले.

इकडे सुदामा संकोचला होता, मान खाली घालून येत होता. भोवतीची मुले त्याच्याकडे बघून हसत होती. श्रीकृष्णाने सरळ चिखल कालवायला सुरुवात केली. आपला नायक काम करतो आहे हे पाहून त्या कामावरची ती दोन मुले लगेच कामाला लागली. श्रीकृष्णाने थोडा वेळ त्यांचे काम पाहिले. मग आजूबाजूला पाहिले. जवळच सुदामा मान खाली घालून उभा होता.

श्रीकृष्ण त्याच्याजवळ गेला. म्हणाला, ‘सुदामा तू अजून असा उभा का ?’

सुदामा काहीच बोलेना.

‘अरे, तुझ्या अंगात ताकद नाही तर अशी जड कामे कशाला करतोस ? आपल्याला पेलवेल असे काम करावे. छोटे काम करण्यात कमीपणा कशाला मानायचा ? तुला पाणीच आणायचं ना, मग छोटचा कळशीतून आणावं. चल असा उभा राहू नकोस नुसता. नदीवर जा आणि छोटचा कळशीतून पाणी आण. अरे, तू पाणी आणलं नाहीस तर आपलं काम अडेल, प्रेमाने त्याची पाठ थोपटत कृष्ण म्हणाला. त्याच्या हाताचा चिखल सुदाम्याच्या पाठीला लागला. कृष्ण तो झटकू लागला तोच सुदामा म्हणाला, ‘असू दे कृष्णा, तुझ्या प्रेमाची खूण माझ्या पाठीवर असताना, मला काम करायला उत्साहच येईल.’

कळशी घेऊन सुदामा निघाला. आता तो झपझप नदीकडे चालला होता.

श्रीकृष्ण आणि सुदामा हे सांदीपनींचे विद्यार्थी. श्रीकृ… घरचा श्रीमंत. मोठा पराक्रमी. सगळीकडे त्याचे कोडकौतुक झालेले. लहानपणापासूनचे त्याचे सारे जीवनच अद्‌भूत. त्यामुळे तो सगळ्यांचा आवडता झालेला !

या उलट सुदाम्याचे. तो मूळचाच गरीब परिस्थितीने आणि स्वभावानेही आपल्या गरीबीचे त्याला नेहमीच वाईट वाटायचे. आश्रमात तो आला ते ज्ञानलालसेमुळे. तो हुषार होता. पण आपल्याबरोबरची श्रीमंत मुले पाहिली की तो बावरायचा, संकोचायचा. सांदीपनींच्या आश्रमात भेदाभेदाला स्थान नव्हतेच, सगळ्या मुलांना समानतेने वागण्याची शिकवण पहिल्यापासून देण्यात यायची. पण सुदामाच संकोची. त्यामुळे तो एकटा एकटाच बसायचा. त्याचा हा एकटेपणा श्रीकृष्णाने हेरला आणि हळूहळू त्याच्याशी प्रेमाने बोलून त्याचा एकाकीपणा घालवला. हळूहळू श्रीकृष्ण आणि सुदामा हे अगदी जिवलग मित्र बनले. दोघांनाही एकमेकांशिवाय करमेनासे झाले. दोघे एकत्र बसायचे. रात्री दोघे एकत्र बसून गप्पा मारायचे. काय काय विषयांवर त्यांची चर्चा व्हायची. त्या दोघांची ही मैत्री सगळ्यांच्या डोळ्यात भरली होती. एकदा तर सांदीपनी गुरुजी सुद्धा म्हणाले, ' दोघे अगदी सख्खे भाऊ शोभतात ! '

## न सांगता केलेले काम !

सायंकाळची वेळ. अंधार पडू लागला होता. सगळे विद्यार्थी आश्रमात जमले होते. बाहेरची सगळी कामे संपली होती. आता नदीवरून सायंकाळचे स्नान आणि संध्या करून यायचे आणि

गुरुजींजवळ रात्रीचा पाठ घ्यायचा. मग भोजन करायचे आणि झोपी जायचे.

भोजन तयार करण्याचे काम गुरुपत्नीकडे असायचे. सरपण गोळा करून आणण्याचे काम विद्यार्थी करायचे. आणखी काही मदत लागेल ती विद्यार्थ्यांकडून मिळायची. गुरुपत्नीचेदेखील आपल्या आश्रमातील विद्यार्थ्यांवर स्वतःच्या मुलासारखे प्रेम असायचे. आईवडिलांना, बहीण–भावंडांना सोडून ही मुले बारा बारा वर्षे शिक्षणासाठी आश्रमात राहायची. मग त्या आई बापा-वेगळ्या मुलांवर ती मातेसारखे प्रेम करायची. त्यांच्या दुखल्या खुपल्याची काळजी घ्यायची. कोणी आजारी पडले तर त्याची सेवा करायची. नवीन आलेल्या मुलांना तर गुरुपत्नीची खूपच आवश्यकता असायची. त्यावेळेला त्यांच्या मनात गुरु-पत्नीविषयी जो आदर निर्माण होई तो शेवटपर्यंत टिके. विद्यार्जन संपवून मुले आपापल्या घरी जायला निघत. न चुकता गुरू-पत्नीच्या पायावर डोके ठेवीत गुरुपत्नी त्यांना उठवून प्रेमाने त्यांच्या डोक्यावरून हात फिरवी. तिच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत. मोठ्या कष्टाने मुले निरोप घेत तेव्हा त्यांना आपल्या आईला सोडून चालल्याचे दुःख होई.

त्या दिवशी गुरुपत्नी स्वयंपाकाच्या तयारीला लागल्या. चूल पेटविण्यासाठी सरपण हवे होते. आश्रमाच्या एका कोपऱ्यात ते ठेवलेले असायचे. सरपण आणण्यासाठी त्या जागी गेल्या, ‘अगबाई, सरपण संपलं वाटतं. आता सगळी मुले नित्यकर्मे आटपून येतील सरपणाशिवाय स्वयंपाक कसा होणार ?’ गुरुपत्नी काळजीत पडल्या. संध्याकाळी स्नान करून गुरुपत्नीला नमस्कार करण्यासाठी आलेल्या श्रीकृष्णाने ते उद्गार ऐकले.

सुदामाही त्याच्याबरोबर होताच. ते दोघेही तसेच माघारी वळले.

बलराम आश्रमाच्या दाराशी उभा होता. तोही नुकताच स्नान करून आला होता. श्रीकृष्णाने त्याला बरोबर घेतले. तिघेजण निघाले, ते जंगलाच्या दिशेने वाट चालू लागले. तिघांच्याही बरोबर कुऱ्हाडी होत्याच. अंधार व्हायच्या आत काम होणे आवश्यक होते.

थोड्याच वेळात तिघांच्याही कुऱ्हाडी काम करू लागल्या. बलराम आणि श्रीकृष्ण झपाझप काम करीत होते. कुऱ्हाडींचे घाव सपासप झाडावर पडत होते. सुदामा मात्र हळूहळू काम करीत होता. कुऱ्हाडीचे चार पाच घाव मारले की दमत होता. कपाळावर आलेला घाम बोटांनी निपटून पुन्हा कुऱ्हाड उचलत होता. त्याची ती अवस्था पाहून श्रीकृष्ण त्याला म्हणाला, 'सुदामा अरे तू उगीचच दमू नकोस. आम्ही आत्ता लाकडं तोडतो. तू स्वस्थ बैस.'

श्रीकृष्णाच्या त्या बोलण्याने सुदामा स्वस्थ बसला. पण किती वेळ? अगदी थोडा वेळ! लगेच कामाला सुरुवात. आपले सहकारी गुरुसाठी कष्ट करतात. आपण कसे स्वस्थ बसायचे? त्यांनी दहा लाकडे तोडली तर मी एक तोडीन. पण स्वस्थ बसणार नाही! श्रीकृष्णाने त्याला काम करताना पाहिले. तो नुसताच हसला. सुदाम्याची वृत्ती त्याला माहीत होती. सुदाम्याला कष्ट करायची खूप हौस. पण त्याची प्रकृती बेताची होती.

लौकरच पुरेशी लाकडे तोडून झाली. त्यांच्या मोळ्या

बांधण्यात आल्या. प्रत्येकाच्या डोक्यावर एकेक मोळी. सगळे आश्रमाकडे निघाले.

इकडे आश्रमात सगळे या तिघांच्या शोधात होते. गुरुजी त्यांची काळजी करीत होते. आपले लाडके शिष्य या अंधारात कुठे गेले म्हणून ते काळजी करू लागले. वेळ जाऊ लागला तसतसे अस्वस्थ होऊ लागले. त्यांनी सगळ्यांना विचारले 'अरे, कुणी त्या तिघांना बाहेर जाताना पाहिलं का ?'

एक मुलगा म्हणाला, 'होय, गुरुजी. मघाशी मी त्या तिघांना रानाच्या बाजूला जाताना पाहिलं ! मी कुठे चाललात म्हणून विचारलं तर काही बोलले नाहीत.'

त्या मुलाच्या उत्तराने गुरुजी विचारात पडले. रानाच्या बाजूला ? आणि यावेळी ? काय बरं काम असावं ? काहि. काम असल्याशिवाय ते जाणार नाहीत. लाकडे तोडायला तर गेले नसतील ? छे ! यावेळी कशाला जातील ते लाकडे तोडायला ? तरी त्यांनी गुरुपत्नीला विचारले. तिने उत्तर दिले, 'नाही. आश्रमातली लाकडे संपली हे तर खरे. पण मी काही कुणाजवळ बोलले नाही त्याबद्दल !'

तोच बाहेर गडबड ऐकू आली. थोड्याच वेळात डोक्यावर मोळ्या घेतलेले श्रीकृष्ण, बलराम आणि सुदामा आत शिरले. गुरुजींनी पत्नीकडे पाहिले. तिच्या चेहऱ्यावरही आश्चर्य होते. गुरुजींनी विचारले, 'अरे, तुम्ही कुठे गेला होता ?'

'लाकडे आणण्यासाठी रानात गेलो होतो गुरुजी !' श्रीकृष्ण म्हणाला.

'अरे, पण कुणी सांगितलं तुम्हाला लाकडं आणायला ?'

'कोणी नाही ! आश्रमातली लाकडं संपली होती. आजच्या स्वयंपाकालासुद्धा लाकडे नव्हती म्हणून....'

'ठीक आहे. जा. त्या मोळ्या जागी ठेवून या आणि पुन्हा असे न सांगता जाऊ नका.' गुरुजींनी ताकीद दिली. पण त्यांच्या नजरेत मात्र कौतुक होते. त्यांना वाटले किती गुणी आहेत ही मुले. यांना कोणी काम सांगावे लागत नाही. परिस्थिती ओळखून ही मुले आपणहून काम करतात.

रात्रीच्या भोजनाच्या वेळी गुरुजींनी त्या तिघांना मधे बसवले. बाकी सगळेजण त्यांच्या भोवती गोल करून बसले. त्या तिघांनी केलेल्या कामगिरीचा गौरव होता तो !

## आश्रमाचा निरोप

पहाट झाली. पक्ष्यांच्या आवाजाने भोवतालचा भाग गजबजून गेला. सुदामा जागा झाला. आश्रमाच्या बाहेर आला. वातावरण प्रसन्न होते. हिरवीगार झाडे डोळ्यांना सुखावीत होती. सुदामा डोळे भरून ते दृश्य पाहात होता. मनात साठवत होता. पुन्हा हे दृश्य पाहायला मिळणार नव्हते. सांदीपनींच्या आश्रमातली आजची याची शेवटची पहाट होती.

सुदामा कोणाशी बोलला नाही. आपला पंचा खांद्यावर टाकून तो नदीकडे निघाला. आश्रमातल्या आयुष्यातले हे शेवटचे स्नान ! सुदामा आज गप्प झाला होता. आतापर्यंतचे आश्रमातले दिवस त्याला आठवत होते. कडू गोड आठवणींनी भरलेले ते दिवस ! मित्रांनी केलेल्या खोड्या, श्रीकृष्णाचे गोड बोलणे,

गुरुजींनी आपल्या हुषारीची केलेली स्तुती, गुरुपत्नीची आपुलकी, कधी कधी मायेने पाठीवरून फिरविलेला हात. एवढेच काय आश्रमाच्या भोवतालच्या निसर्गाशी सुद्धा एवढ्या वर्षात त्याचे जणू नाते जोडले गेले होते. नदीविषयी, झाडांविषयी, पक्ष्यांविषयी असणाऱ्या त्याच्या भावना तो व्यक्त करू शकत नव्हता चालता चालता तो नदीकाठी एकटाच येऊन बसत असे. नदीच्या प्रवाहाचा संथ आवाज ऐकत, त्यातून वाहात येणाऱ्या नाना वस्तू पाहात तो विचार करीत बसे.

सुदाम्याने स्नान केले. कोरडा पंचा नेसून, संध्या करून दुसऱ्या पंचाचा पिळा खांद्यावर टाकून तो पुन्हा आश्रमाकडे चालू लागला. पुन्हा त्याला कसलीशी आठवण झाली. तो मागे फिरला. नदीकाठी उभा राहिला. खाली वाकून त्याने ओंजळीत पाणी घेतले. ओंजळ कपाळाला लावून ते पाणी परत नदीत सोडले. तेव्हा त्या पाण्यात त्याच्या अश्रूंचे दोन थेंब मिसळले होते. नदीला नमस्कार करून तो परत फिरला.

सुदामा दिवसभर असाच गप्प होता. तोच काय श्रीकृष्ण, बलराम, सांदीपनी, गुरुपत्नी सगळेच गप्प होते. आश्रमातले वातावरणच आज बदलले होते. सगळ्यांनाच ते जाणवत होते. गुरुजींनी त्यादिवशी शेवटचा पाठ दिला खरा. पण त्यांचेही त्यात लक्ष नव्हते. दुपारच्या भोजनाच्या वेळीही सगळे गप्प होते. गुरुपत्नी आग्रहाने वाढत होत्या. पण आज पोटात भूक कुठे होती ?

भोजनानंतर सुदामा आणि श्रीकृष्ण एकत्र होते खरे पण कोणीच कोणाशी बोलत नव्हते. ते रानात जाऊन एके ठिकाणी समोरासमोर बसले. तरी दोघे गप्पच. दोघांची तोंडे बंद पण

मने मात्र उघडी होती. त्यातून अनेक आठवणी बाहेर येत होत्या. त्यामुळे ते दोघे नुसते एकमेकांकडे पाहात बसले.

बराच वेळ ते दोघे असेच बसून राहिले. मग श्रीकृष्ण उठला. सुदामाही पाठोपाठ उठला. दोघे परत आश्रमाकडे जाऊ लागले. तोच कृष्ण म्हणाला, 'सुदामा, आज आपण आश्रम सोडणार. तुझी वाट वेगळी. माझी वाट वेगळी. आयुष्यात आपली गाठ पुन्हा पडेल न पडेल कोणी सांगावे ? पण निदान माझी आठवण तरी तुला राहील का रे ? आपला एक मित्र होता श्रीकृष्ण नावाचा, हे राहील तुझ्या लक्षात ?'

'कृष्णा, अरे तुला मी कसा विसरीन. आपली ही मैत्री सदैव माझ्या स्मरणात राहील.'

'आत्ता म्हणशील हे सगळं. पण एकदा आपल्या गावी गेलास, संसारात गुंतलास की सगळं विसरशील.'

'छे ! अरे या गोष्टी का विसरण्यासारख्या आहेत ! माझ्यासारख्या गरिबाच्या मागं काय व्याप असणार ? मग तो सांभाळताना तुझा विसर कसा पडेल ? उलट तू मोठा श्रीमंत, पराक्रमी, तुझ्यामागे अनेक कामे ! संभाळण्यात तू गुंग होशील. तुझ्या भोवताली असंख्य माणसे असतील. त्यात तू मला विसरलास तर मला आश्चर्य वाटणार नाही !'

'सुदामा, नको रे बोलूस असं.... माझ्या आयुष्यात कोणतेही प्रसंग घडले, कितीही माणसांचा संबंध आला तरी तुझ्यासाठी माझ्या मनात एक कप्पा राहील. त्या कप्प्यात कोणी प्रवेश करू शकणार नाही !'

'कृष्णा परत आपण कधी भेटू का रे ?'

'का नाही ? तुला आठवण येईल तेव्हा अवश्य माझ्याकडे ये. मी तुझी वाट पाहीन सुदामा ! मी तुझी वाट पाहीन !'

संभाषण तिथेच थांबले. उरलेली वाट ते न बोलता चालत राहिले.

संध्याकाळी निरोप घ्यायची वेळ झाली. सुदामाने गुरुजींना नमस्कार केला. 'यशस्वी व्हा ! ' गुरुजींनी आशीर्वाद दिला. गुरुपत्नीला नमस्कार केला. तिने पाठीवरून मायेचा हात फिरविला तेव्हा सुदाम्याच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले आणि गुरुपत्नीच्याही !



श्रीकृष्णाने गुरुदक्षिणा काय देऊ म्हणून विचारले. गुरुजी 'काही नको' म्हणत असतानाही श्रीकृष्णाने आग्रह चालू ठेवला. शेवटी गुरुजी म्हणाले, 'माझा मुलगा समुद्राने नेला आहे तो आणून दे.'

सुदामा ते पाहात होता. त्याच्या मनात आले. 'मी गरीब आहे. मला काय गुरुदक्षिणा देता येणार ?'

गुरुजींनी त्याचे विचार ओळखले. गुरुजींनी त्याला जवळ बोलावून म्हटले, 'बेटा असा दुःखी होऊ नकोस. अरे मी शिकवलेलं प्रत्यक्षात आणून यशस्वी जीवन जगून दाखवणं हीच माझी गुरुदक्षिणा आहे. तुम्हीं सुखी झालात की माझी गुरुदक्षिणा मला मिळाली.'

आश्रमातून सुदामा, श्रीकृष्ण, बलराम, बाहेर आले. ते चालू लागले. थोड्या अंतरावर गेल्यावर सुदाम्याने मागे वळून पाहिले. गुरुजी दारात उभे होते. इतर विद्यार्थीही दारात उभे होते. गुरुपत्नी कोठे दिसत नव्हत्या. सुदाम्याने ओळखले त्या आश्रमातच बसल्या असतील अश्रू ढाळत. आपल्याला आश्रम सोडताना पाहिले तर त्यांना विरहाचे दुःख सहन होणार नाही. म्हणून त्या आत आहेत तेच बरे. गुरुजींकडे बघून त्यांनी नमस्कार केला आणि ते सगळे पुन्हा चालू लागले.

## कृष्णाची आठवण

विद्याध्ययन संपवून सुदामा आपल्या गावी गेला. सुदाम्याचे गाव तसे अगदीच लहानही नव्हते आणि फार मोठेही नव्हते. गावात विद्वत्तेचा कुणाला गंधही नव्हता. सुदामा गुरुजींजवळ

विद्याध्ययन करून आला तेव्हा सुरुवातीला त्याचे कौतुक झाले खरे, पण ते नुसते तोंडापुरतेच. अशा कौतुकावर का माणूस जगतो ?

आपले गाव, आपली भूमी, आपली माणसे सोडून दूर कोठे जाऊ नये. येतील ते दिवस येथेच कंठावेत असे सुदाम्याला वाटायचे. त्यामुळे गाव सोडून जायचा विचार त्याच्या मनात कधी आला नाही. थोड्या दिवसांनी सुदाम्याचे लग्न झाले. मुलेबाळे झाली. आता सुदाम्याला अगदीच कठीण दिवस आले. भिक्षा मागून अन्न मिळविण्याची पाळी आली. सांदीपनींचा शिष्य रोजच्या अन्नाला महाग झाला.

तसा सुदामा मूळचाच दरिद्री. तो एकटा असताना मोठा सुखी होता असे नाही. पण पत्नी, पोरेबाळे यांचा व्याप होताच. त्याची स्थिती फारच केविलवाणी झाली. त्या एवढ्याशा घरात सुदामा आणि पत्नी राहात कुडाच्या भिंती, त्यांची माती, शेण सुद्धा ठिकठिकाणी पडून गेलेले. घराला चौकट नव्हती. छप्पर सुद्धा अगदी नावाला. उन्हाळ्यात त्यातून सूर्याचे किरण आत डोकवायचे, पावसाळ्यात पावसाच्या पाण्याने घराचे तळे व्हायचे आणि थंडीत घरात शिरणाऱ्या बोचऱ्या वाऱ्यांनी कुडकुडायला व्हायचे. अंगावरच पुरेसे कपडे असण्याची पंचाईत तर अंथरा-पांघरायला कुठून आणणार ?

घरात भांडी सुद्धा अपुरी अर्थात होती तीही मातीचीच. कधी भिक्षा मिळेल, तेव्हा ती भांडी चुलीवर चढायची. केव्हा केव्हा सात-सात दिवस ओळीने त्या कुटुंबाला उपास काढावे लागत नुसते पाणी पिऊन राहावे लागे. अगोदरच हाडकुळा असलेला सुदामा या परिस्थितीने आणखीनच अशक्त दिसू लागला. स्वत: अशक्त असल्याचे त्याला काही वाटत नसे. पण



उपाशी तापाशी राहिलेली पोरं पाहिली, काळजीने खंगलेली पत्नी पाहिली की त्याचे अंतःकरण तिळतिळ तुटे. तो विचार करी. 'काय उपयोग माझ्या विद्वत्तेचा ! मी माझ्या मुलाबाळांना खायला घालू शकत नाही. राहायला चांगलेसे घर देऊ शकत नाही. गुरुजी ! काय करू मी ?' मग त्याला आश्रमातले दिवस आठवत. त्या गोड आठवणी काढत असता त्याच्या मनाला थोडा विरंगुळा वाटे–त्याला ते श्रीकृष्णाचे शेवटचे शब्द आठवत–'मी तुझी वाट पाहात असेन.' सुदाम्याला वाटे खरेच तो आपली वाट पाहात असेल का ? केवढे त्याचे राज्य ! केवढा त्याचा व्याप ! तो मला नक्कीच विसरला असेल. पण मनातील एका कोपऱ्यात त्याला वाटायचे श्रीकृष्ण मला विसरणार नाही. मुळीच विसरणार नाही.'

## कृष्णाकडे जाणाचा बेत

अलीकडे सुदामा सारखी श्रीकृष्णाची आठवण काढायचा. सारखा आपल्या बायकोजवळ श्रीकृष्णाच्या गोष्टी सांगायचा ! पूर्वी त्याला आठवण येत नव्हती असे नाही, पण कधी तरी अधूनमधून ! आता मात्र तो रोज श्रीकृष्णाची आठवण काढून म्हणू लागला, 'अगं, तुला काय सांगू माझ्या श्रीकृष्णाचे गुण. त्याचं चालणं, त्याचं बोलणं, त्याचं वागणं सारं कसं गोड. माणसाला मोहित करील असं. आमची खूप मैत्री होती. सगळीकडे आम्ही बरोबर असायचो, पाठ घेताना, काम करताना, भोजनाच्या वेळी, रानात जाताना, नदीवर जाताना, विश्रांती घेताना कायम आम्ही बरोबर. एकदा गुरुजी म्हणाले देखील होते–' हे दोघे अगदी भाऊ शोभतात.' अजून ते शब्द माझ्या कानात घुमताहेत. विद्याध्ययन झाल्यावर एकमेकांचा निरोप घेताना तर आम्हाला इतकं वाईट वाटलं. एका मनाचे दोन तुकडे केले तर काय होईल ? श्रीकृष्णाचे आणि माझे शरीर वेगळे आहे. पण मन एक आहे. एकमेकांपासून दूर जाताना आमच्या किती यातना झाल्या असतील ?'

'एवढं आहे तर तुम्ही एकदा जाऊन या आपल्या मित्राकडं.' पत्नी सहजपणे म्हणाली.

**सुदामा** : हो....पण हे मन मोठं विचित्र आहे. ते नाना शंकाकुशंका काढतं. श्रीकृष्णाने मला ओळखलं नाही तर ? श्रीमंत माणसं गरिबाला फार चटकन विसरतात ! विसरला नसला तर निदान तसं सोंग करतात.

**सुदाम्याची बायको** : पण तुमचा मित्र काही....

**सुदामा** : हो माझ्या मित्र तशातला नाही. तो मला विसरणार नाही. पण काय सांगावं ? आजूबाजूची परिस्थिती माणसाला बदलवते. सडक्या फळाच्या सहवासानं चांगलं फळ सुद्धा सडतं.

**सुदाम्याची बायको** : हो पण सगळ्यांचच तसं असेल असं नाही. काही माणसं कमळासारखी असतात. चिखलात जन्मून, चिखलात राहून सुद्धा ती निर्मळ राहातात, पवित्र राहातात, तुमचा हा श्रीकृष्ण असा असेल तर.

**सुदामा** : माझा श्रीकृष्ण तसाच आहे ग तसाच आहे. तो चिखलात राहून स्वत: अपवित्र बनणार नाही तर त्या चिखलाला पवित्र बनवील.

**सुदाम्याची बायको** : मग कशाला काळजी करावी ? लवकरच जावं म्हणते मी.

**सुदामा** : अगं वेडे पण मी गेल्यावर इथं कोण बघणार ? या पोराबाळांना उपाशी ठेवून माझ्याच्यानं काही बाहेर पाऊल टाकवणार नाही !

**सुदाम्याची बायको** : असं काय म्हणावं ते. मी नाही का इथं ? दोन घरचं मागत होते ते चार घराचं मागीन. भागवीन कसं तरी....

**सुदामा** : त्यापेक्षा आपण सगळेच गेलो तर ?

**सुदाम्याची बायको** : अहो कसं जमेल ते ? ही पोरं लहान. वर तुमच्या श्रीकृष्णाची नगरी किती लांब. मला सुद्धा त्रास होईल. इथं राहिलो तर गावातले लोक प्रसंगी काही मदत

करतीलच की ! त्यांनाही अंतःकरण आहे. आम्हाला काही अगदीच उपाशी मरू देणार नाहीत ते !

**सुदामा** : अगं पण....

**सुदाम्याची बायको** : आता पण वगैरे काही नको. तुम्ही आपल्या मित्राकडं खुशाल जा. तो चांगला श्रीमंत आहे. काहीतरी मदतही करील आपल्याला नाहीतरी सगळं आयुष्य असंच कंठायचं ना ? त्यापेक्षा तुमच्या मित्रानं मदत केली तर निदान पोराबाळांना तरी सुखाचे दिवस दिसतील म्हणते मी ! तुम्ही आता असं करा. उद्या सकाळीच निघा. चांगल्या कार्याला विलंब नको !

शेवटी एकदाचा सुदामा श्रीकृष्णाकडे जाण्यास तयार झाला.

**सुदामा** : अगं इतक्या वर्षांनी मी श्रीकृष्णाला भेटायला जाणार काही भेट तरी देशील की नाही त्याला ?

**सुदाम्याची बायको** : काय देणार ? आहे काय आपल्याकडं द्यायला ?

**सुदामा** : काय असेल ते दे.

**सुदाम्याची बायको** : थोडेसे पोहे फक्त आहेत. ते देऊ ?

**सुदामा** : हो चालतील.

सुदाम्याची बायको त्याच्याकडे बघायलाच लागली. एवढ्या श्रीमंत माणसाला भेट म्हणून हे एवढेसे पोहे घेऊन जाणार ? पण सुदाम्याचा निष्पाप चेहरा तिने पाहिला त्याच्या चेहऱ्यावर कोणतीही शंका नव्हती. ते पाहून तिने मुकाट्याने पोह्याची पुरचुंडी बांधून दिली.

एरवी लांबलचक वाटणारा तो दिवस श्रीकृष्णाला भेटायला जायच्या आनंदात पटकन् संपला. रात्रीही सुदाम्याला झोप आली नाही. त्याच्या डोळ्यांसमोर दिसत होता द्वारकेचा रस्ता, न पाहिलेली द्वारकानगरी आणि त्या द्वारकानगरीतला श्रीकृष्ण.

## द्वारकेत तर पोहोचलो !

दुसऱ्या दिवशी सूर्योदयाबरोबरच सुदामा झोपडीबाहेर पडला. त्याची पत्नी दारात उभी होती. पोरे भोवती जमली होती. धाकट्याने तर सुदाम्याबरोबर जाण्याचा हट्टच धरला. तो रडू लागला. सुदाम्याने त्याला कडेवर घेतले. नाना प्रकारांनी त्याची समजूत घातली. शेवटी एकदाचा तो गप्प बसला. मोठ्या कष्टाने सुदाम्याने त्याला आपल्या पत्नीकडे दिले आणि तो निघाला. गावाच्या वेशीवर आल्यावर त्याने गावाला नमस्कार केला आणि तो चालू लागला. थोडा वेळ आपल्या कुटुंबाचे विचार त्याच्या मनात येत राहिले, पण जसजसा तो दूर जाऊ लागला तसतसे त्याचे मन श्रीकृष्णाविषयीच्या विचारांनी भरून गेले. त्याची पावले आता झप झप पडू लागली.

'द्वारकेला हाच रस्ता जातो ना ? ' तो प्रश्न ऐकून घोड्यावरील त्या शिपायाने आश्चर्यचकित होऊन सुदाम्याकडे पाहिले. त्याच्या समोर एक अशक्त माणूस उभा होता. गालाची हाडे वर आली होती. डोळे खोल गेले होते. दाढी वाढली होती. कमरेचे धोतर जरा अपरेच. त्यालाही सतरा ठिगळे ! पायात काही नव्हते. पण एक मात्र होते. त्या माणसाच्या चेहऱ्यावर

कसलेसे तेज होते. विद्वत्तेचे असेल पण या दरिद्री वेषातही ते लोपले नव्हते. त्याच्या गळ्यातले जानवे सांगत होते तो ब्राह्मण आहे.

'द्वारकेला हाच रस्ता जातो ना ?' सुदाम्याने पुन्हा प्रश्न विचारला.

'हो, हाच.' तो शिपाई उत्तरला. या दरिद्री माणसाचे द्वारकेत काय काम हेच त्या शिपायाला कळत नव्हते. विचारावे म्हणून त्याने तोंड उघडले तो सुदामा चालू पण लागला होता. त्याची पावले झपझप पडत होती. 'जाऊ दे असेल कोणीतरी ब्राह्मण ! काही दक्षिणा मिळायच्या आशेने चालला असेल. आपण तरी कशाला खो घाला ?' या विचाराने तो शिपाई पुढे जाऊ लागला. घोड्याच्या टापांचा आवाज सगळीकडे घुमला.

ती सुंदर भव्य द्वारकानगरी लांबून पाहून सुदाम्याला आनंदाचे भरते आले. द्वारकानगरीजवळचे मोठमोठाले सुंदर राजरस्ते पाहून तो दिपून गेला. रस्त्यावरून जाणारे रथ, त्या रथाला जुंपलेले सुंदर सुंदर घोडे, सारथ्याचा भरजरी पोषाख, आतल्या सरदाराचा रुबाब, रथाचा धडधडाट, घोड्यांच्या गळ्यातील मण्यांच्या माळांचा आणि घंटांचा घणघणाट यांनी त्याच्या कानांना, डोळ्यांना आणि मनाला फार आनंद झाला.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंना टोलेजंग आणि सजविलेल्या हवेल्या. दरवाजे, खिडक्या, गच्च्या सारे कसे मोहक, सुंदर ! त्यावरची कलाकुसर कशी डोळ्यांना सुखवणारी. राजरस्त्यावरून मधून मधून शिपाई दिसत होते. त्यांचे सारेच रुबाबदार. चेहरा,

मोहरा, कपडे, बसणे, चालणे एवढेच काय त्यांचे घोडे सुद्धा ! ते सारे पाहून सुदाम्याला वाटले 'कुठं श्रीकृष्णाचं वैभव आणि कुठं आपली गरिबी.' रस्त्यावरील लोकांच्या नजरा आपल्याकडे वळताना पाहून त्याचा हा विचार आणखीनच बळावला. त्याला वाटले आपले हे येणे म्हणजे राजसभेत दरिद्री माणसाने भाग घ्यावा किंवा विद्वानांच्या सभेत एखाद्या मूर्खाने जावे तसे आहे. या वैभवाला आपल्या येण्याने डाग लागला तर? नको रे बाबा असेच परतावे ! येथून दूर पळून जावे !

पण त्याचे दुसरे मन श्रीकृष्णाच्या भेटीसाठी आतुर झालेले होते. ते मन परतायला तयार होईना. शरीर सुद्धा कसे अगदी त्याच मनाच्या बाजूचे ! ते आपले चालत राहिले श्रीकृष्णाच्या महालाकडे !

'ओ बाबा कुठे चाललात ?' दारावरच्या शिपायाने सुदाम्याला हटकले. हाच ब्राह्मण काल त्याला द्वारकेचा रस्ता विचारत होता.

'का रे बाबा ?'

'अहो काय काम आहे तुमचं इथं. दक्षिणा वगैरे पाहिजे असेल तर त्या तिकडे जा. त्याठिकाणी ब्राह्मणांना दक्षिणा देण्याची आमच्या महाराजांनी व्यवस्था केली आहे.'

'पण मला दक्षिणा नकोय.'

'मग काय पाहिजे ?'

'मला माझ्या मित्राला भेटायचंय.'

'कोण मित्र ?'

'श्रीकृष्ण !'

'भटजीबुवा, तुम्हाला वेड तर नाही ना लागलं ? सरळ आमच्या महाराजांशी मैत्री सांगताय ?'

'अरे बाबा मी खरंच सांगतोय. आम्ही सांदीपनींच्या आश्रमात एकत्र होतो.'

तेवढ्यात श्रीकृष्ण बाहेर आला. त्याचे लक्ष पहारेकऱ्याशी बोलणाऱ्या सुदाम्याकडे गेले. सुदाम्याची नजर त्याच्याकडे गेली. दोघांनी एकमेकांना ओळखले. श्रीकृष्णाने पुढे होऊन सुदाम्याला कडकडून मिठी मारली. श्रीकृष्णाचे दागदागिने पाहून सुदामा संकोचाने थोडासा मागे सरकला. पण श्रीकृष्णाच्या प्रेमळ हातांचा विळखा अंगाभोवती पडल्यावर त्याचा संकोच नाहीसा झाला. त्यानेही आपले हात श्रीकृष्णाभोवती टाकले. दोघेही मूक, स्तब्ध उभे राहिले. दारावरचे शिपाई डोळे फाडून ती निःशब्द मिठी पाहात होते.


## श्रीकृष्णाला पोहे आवडले !

आपल्या बालमित्राची श्रीकृष्णाने चांगलीच बडदास्त ठेवली. अनेक सेवक त्याच्या दिमतीला दिले. दमून भागून आलेल्या सुदाम्याला सेवकांनी सुगंधी तेले लावून स्नान घातले. उंची कपडे ल्यायला दिले. त्याला एका सजविलेल्या महालात नेण्यात आले. सेवक महालावाहेर निघून गेले. भांबावून गेलेला सुदामा इकडे तिकडे पाहात असतानाच श्रीकृष्ण आत आला.

'अरे, असा उभा का राहिलास ? बैस ना ! प्रवासाचा शीण झाला असेल. जरा विश्रांती घे. पण त्यापूर्वी........तुला

भूक लागली असेल नाही ? कोण आहे रे तिकडे ? जरा फराळाचे ताट घेऊन या बरं......'

थोड्याच वेळात सेवकाने फराळाचे ताट आणून ठेवले. त्यातील नाना पदार्थ पाहून सुदाम्याला आपल्या बायकामुलांची आठवण झाली. ती बिचारी तिकडे उपाशी राहून दिवस काढत असतील. आपण मात्र येथे ऐश्वर्यात लोळत आहोत. नाना पदार्थांनी भरलेली ताटे येथे माझ्यासमोर आहेत. माझ्या मुलांना कधी स्वप्नातसुद्धा पाहायला मिळणार नाहीत, असे हे पदार्थ. त्यांना उपाशी ठेवून खाण्याचा मला काय अधिकार ?



श्रीकृष्ण सुदाम्याला खाण्याचा आग्रह करीत होता. तर सुदाम्याच्या मनात हे विचार चालले होते. आपली स्थिती कृष्णाच्या लक्षात येऊ नये म्हणून त्याने खिडकीकडे तोंड वळवून हळूच आपले डोळे कोरडे केले.

श्रीकृष्णाच्या आग्रहासाठी अखेर सुदाम्याला फराळ करावाच लागला. फराळ चालू असताना श्रीकृष्णाने त्याला बरेच प्रश्न विचारले. प्रवास कसा झाला, घरची मंडळी कशी आहेत, गाव काय म्हणते, सुदाम्याचा उद्योग काय, एक ना दोन ! नाना प्रश्न. या प्रश्नांची उत्तरे देताना सुदाम्याच्या नाकी नऊ आले. झाकली मूठ सव्वा लाखाची ! ती उघडून त्यातली फुटकी कवडी कशाला दुसऱ्याला दाखवायची ? पण श्रीकृष्ण मोठा धूर्त. सुदाम्याने मूठ झाकायचा कितीही प्रयत्न केला तरी त्याला आतली कवडी दिसलीच. पण त्याने तसे दाखवले नाही. तो आपला बोलतच राहिला. 'अरे, वहिनींनी मला भेट म्हणून काही दिले की नाही ?'

भाबड्या सुदाम्याचा हात इकडे तिकडे गेला. पुन्हा त्याचे लक्ष समोरच्या ताटाकडे गेले. त्याचा चेहरा कावराबावरा झाला. श्रीकृष्णाने पुन्हा तोच प्रश्न विचारला. सुदामा इकडे तिकडे पाहू लागला. आता श्रीकृष्णाला संशय आला. तो म्हणाला, 'काय शोधतो आहेस रे ?'

सुदाम्याने पोह्याची पुरचुंडी बाहेर काढली नाही तोच श्रीकृष्णाने त्यावर झडप घातली. आतील पोहे पाहाताच त्याचे डोळे आनंदाने लकाकले. तो मोठ्या चवीने ते पोहे खाऊ लागला. सुदामा त्याच्याकडे पाहातच राहिला.

पोहे खाऊन होताच श्रीकृष्ण म्हणाला, ‘ मित्रा, किती चविष्ट होते म्हणून सांगू ! माझी वहिनी अगदी सुग्रण दिसतेय ! मजा आहे गड्या तुझी. अरे रोज असे सुग्रास जेवण मिळते तुला !’

‘ उगाच का गरिबाची थट्टा करतोस ? अरे या पंच-पक्वान्नांपेक्षा चविष्ट लागावेत असं त्या पोह्यात होतं तरी काय ?’

‘ काय होतं ? अरे, काय नव्हतं त्यात ? त्यात प्रेम होतं, आपुलकी होती, स्नेहभाव होता, या गोष्टी बाजारात विकत मिळत नाहीत मित्रा. त्या तुझ्यासारख्या किंवा तुझ्या पत्नी-सारख्या लोकांच्या अंतःकरणातून पाझरतात. असा हा स्नेहाचा झरा आज माझ्या घरी आलाय. त्यात डुंबण्याचा आनंद किती मोठा आहे ते कसं सांगू ? अरे ! हे सारं वैभव त्यापुढं तुच्छ आहे ! हा आनंद मला मनसोक्त उपभोगू दे ! त्यासाठी राहाशील ना तू इथं खूप दिवस ? राहाशील ना ? माझ्या-साठी ?’ सुदाम्याचे खांदे धरून श्रीकृष्ण विचारीत होता.

सुदामा बिचारा काय बोलणार ? तो गप्प उभा होता.

## खूप झाला पाहुणचार !

सुदामा खरेच राहिला. अगदी खूप दिवस श्रीकृष्णाकडे राहिला. राजैश्वर्याचा उपभोग घेत, मित्राच्या संगतीत, पूर्वीच्या आठवणीत दिवस कसे निघून जात होते ते कळत नव्हते. श्रीकृष्ण आणि सुदामा एकत्र आले की आपापली परिस्थिती विसरून जात. सुदामा आपली गरिबी विसरे. श्रीकृष्ण आपले राजेपण

विसरे. दोघे उरत ते मित्र ! निव्वळ मित्र ! खरोखरच निव्वळ मैत्री, ही अशी चीज आहे की ती सगळे भेदाभेद विसरायला लावते. दोघेजण कितीतरी वेळ गप्पा मारीत बसत, त्यांना वेळेचेही भान रहात नसे. मग एखाद्या सेवकाला आत येऊन खूप वेळ झाल्याची जाणीव करून द्यावी लागे.

या गप्पात कधी कधी सुदाम्याच्या घरचा विषय निघायचा. अशावेळी सुदामा एकदम गप्प बसायचा. एरवी एवढा बोलका असणारा आपला मित्र घरचा विषय निघाल्यावर गप्प का बसतो, ते श्रीकृष्णाला समजायचे नाही. पण त्यानेही कधी अधिक चौकशी केली नाही. अधिक काही विचारले तर सुदामा अधिक दु:खी होईल, असे त्याला वाटे पण असे का होते तेही श्रीकृष्णाला कळेना. त्याने एक युक्ती केली. आपला दूत सुदाम्याच्या नकळत सुदामाच्या गावी पाठवला !

इकडे सुदामा राजवाड्यात राहात असला तरी त्याला सारखी आपल्या पडक्या घराची आठवण व्हायची. उंची वस्त्रे पाहिली की डोळ्यांसमोर चिंध्या नेसलेली स्वत:ची मुले दिसायची ! पंचपक्वान्ने खाताना आठवण व्हायची मुलांच्या उपासमारीची !

कधी कधी त्याला वाटे श्रीकृष्णाला सगळे सांगून टाकावे. कदाचित तो मदत करील. कदाचित त्याच्या पदरी आपणाला ठेवून घेईल. कदाचित एखादा गाव इनाम देईल. सांगावे का त्याला ? म्हणजे मग सगळा त्रास तरी संपेल. मुलांची–पत्नीची उपासमार थांबेल. त्यांना कपडयालत्त्यांना काही कमी पडणार नाही !

पण असे का ? केवळ तो माझा मित्र आहे म्हणून मी त्याला त्रास देऊ ? त्याच्या राजेपणाचा गैरफायदा घेऊ ? माझ्या दुःखाचा बोजा त्याच्या डोक्यावर का द्यायचा ? आपले दुःख आपण सोसले पाहिजे. दुसऱ्याला का त्याचा त्रास ?

कितीतरी वेळ तो विचार करीत बसे. सांगावे की नको ? शेवटी काहीच निर्णय न घेता तसाच बसून राही.

आता त्याला तीव्रतेने घरची आठवण येई 'लवकरच येतो' म्हणून सांगून आपण निघालो. कितीतरी दिवस झाले. बायको, मुले काळजी करत असतील. आता घरी जायलाच हवे ! मग एक दिवस त्याने तो विषय श्रीकृष्णाजवळ काढला.

'कृष्णा, मी तुझ्या म्हणण्याप्रमाणे इथं खूप दिवस राहिलो. आता मात्र मी माझ्या घरी जातो.'

'का रे ? एवढ्या लवकर कंटाळलास मला ?'

'कंटाळलो नाही रे. पण एखादा पदार्थ आवडला म्हणून तो सारखा खातच राहिलो तर अपचन नाही का होणार ? तुझा सहवास खूप दिवस अनुभवला. आता त्याचे अपचन व्हायला नको. म्हणून जातो.'

'अरे, पण माझे पोट अजून निम्मेसुद्धा भरले नाही त्याचे काय ?'

'ते तसंच राहू दे. आता तुला आठवण झाली की माझ्याकडे ये. मग उरलेलं निम्मं पोट भरेल.'

'तू अगदी हट्टालाच पेटलेला दिसतोस ! पण जरा माझं ऐकतोस का ? दोनच दिवस थांब आता फक्त दोन दिवस ! मग तुला सोडण्याचे मी वचन देतो.'

हो ना करता करता अखेर सुदामा तयार झाला. त्याला वाटले दोन दिवस पटकन निघून जातील. पण या दोन दिवसात श्रीकृष्ण काय गम्मत करणार होता ते कुठे त्याला माहीत होते !

श्रीकृष्ण स्वतःच्या खास महालात आला. त्याने विश्वकर्म्याला बोलावणे पाठवले. विश्वकर्मा आला. हात जोडून श्रीकृष्णाच्या आज्ञेची वाट पाहू लागला.

श्रीकृष्ण म्हणाला, 'ताबडतोब माझा मित्र सुदाम याच्या गावाला जा. तिथं आपल्या द्वारकेसारखी एक सुंदर नगरी तयार कर–त्या नगरीत काहीसुद्धा उणे राहू देऊ नकोस !'

माझ्या राजवाड्यासारखाच सुदामदेवाचा राजवाडा बांध. द्वारकानगरीसारखे मोठमोठे सुंदर रस्ते, टोलेजंग हवेल्या, सुदाम्याच्या वाड्यात हत्ती, घोडे, दास-दासी, सोन्याचांदीची भांडी सर्व काही असले पाहिजे. ताबडतोब नगरी तयार कर आणि हे बघ विसरशील. सुदामदेवाच्या बायकामुलांचे पोषाख भरजरी असू देत. त्यांच्या अंगावर सोने, मोती, हिरे यांचे दागिने असले पाहिजेत. तिथं दही, दूध, तूप, मध, साखर कशाला सुद्धा कमतरता असता कामा नये. तुझं सगळं कौशल्य पणाला लाव पाहिजे. तितके कामगार मदतीला घे. पण दोन दिवसात ही नवी नगरी तयार व्हायला हवी....सुदामनगरी !

## असे हे मित्रप्रेम !

द्वारकेच्या वेशीपाशी रथ थांबला. आतून श्रीकृष्ण बाहेर आला. त्याने हात देऊन सुदाम्याला उतरवले. दोघेही नुसतेच

उभे राहिले. पुढे जाणाऱ्या लांब वाटेकडे पाहात ! आश्रमातील अध्ययन संपल्यावर, शेवटच्या दिवशी निरोप घेताना ते असेच गप्प उभे होते. आताही पूर्वीची मैत्री अजूनही कायम असल्याची खूण होती ती !

द्वारकेची वेस सोडून सुदामा चालू लागला आपल्या गावाच्या दिशेने, श्रीकृष्णाचा सहवास संपला होता. जीवनाच्या वाटेवरून चालताना वाटेत त्याला रम्य अशा वनात विश्रांती मिळाली होती. पण आता परत पुढे तीच उजाड ओसाड वाट होती.

आता त्या वनाचा रम्यपणा विसरायचा कारण बरोबर तिथल्या काहीच खुणा नव्हत्या. होत्या त्या फक्त आठवणी. द्वारका सोडताना तो परत आपल्या मूळच्या वेशात निघाला होता. अंगावरचे सगळे उंची कपडे सुद्धा श्रीकृष्णाने काढून ठेवायला सांगितले होते. तो म्हणाला होता. 'मित्रा, तू हे कपडे इथंच काढून ठेव. वाटेत चोराचिलटांची फार भीती. तुझ्या मूळच्या पोषाखामुळं तू सुखरूप घरी जाशील.'

हो त्याचे सुद्धा खरेच ! त्याला कशाला दोष द्यायचा ! दोष द्यायचा तो आपल्या नशिबाला. या नशिबाने मला या रम्य वनातील चार फळे सुद्धा बरोबर घेऊ दिली नाहीत. माझ्या पिल्लांना ती फळं बघायचं सुख सुद्धा मिळू दिलं नाही !

मजल दरमजल मारत सुदामा आपल्या गावच्या नदीजवळ आला. नदी ओलांडली तरी त्याला आपले गाव काही दिसेना. समोर उंच उंच इमारती दिसत होत्या. जशा श्रीमंतांच्या हवेल्या ! आपण कुठे आलो आहोत तेच त्याला कळेना. रस्ता चुकला की काय ? छे ! ही झाडे तर चांगल्या परिचयाची

दिसतात. ती बघा कुंभार आळीतली मुले तिथे खेळतायेत. पण मग या हवेल्या कुठनं आल्या ?

पण सुदामाला विचार करायला वेळच मिळाला नाही. समोरून घोडेस्वारांचे पथक येत होते. सुदाम्याच्या समोर येऊन ते पथक थांबले. वरच्या स्वारांनी पटापट खाली उड्या टाकल्या. सुदाम्याला नमस्कार करून ते उभे राहिले. त्यांचा नायक पुढे आला. सुदाम्याजवळ येऊन अभिवादन करून तो म्हणाला, ' महाराज, ही आपलीच नगरी आहे. आपण हा पोषाख आणि हे अलंकार घालून नगरीत प्रवेश करावा ! '

सुदाम्याच्या अंगावर भरजरी पोषाख चढवण्यात आला. वर अलंकार घालण्यात आले. तेवढ्यात एक रथ समोर येऊन थांबला. रथातून एक स्त्री खाली उतरली, तिच्या सख्यांनी तिच्या हातात आरतीचे तबक दिले. ती स्त्री सुदाम्याला ओवाळू लागली ! पाहातच राहिला ! आपली पत्नी समोर पाहून तो गोंधळला त्याने स्वतःला एक चिमटा काढला. ' मी जागा आहे की स्वप्नात ? ' त्याने विचारले.

' तुम्ही जागेच आहात. असे गोंधळू नका. ही सारी तुमच्या श्रीकृष्ण महाराजांची कृपा ! ' सुदामदेवाची पत्नी म्हणाली. आता सुदामाला सारे कळले. त्याने द्वारकानगरीकडे पाहात हात जोडले. दुसरे त्याला काय करता येण्यासारखे होते.

' सुदाम महाराजांचा जयजयकार असो. ' सुदामाचा रथ चालला असता जयजयकार होत होता, सुदामाच्या मनात मात्र श्रीकृष्णाचा जयजयकार चालू होता.

९२८४ दि० ३१७१८